# वर्धा नगर परिषद, वर्धा

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 45 आणी**
**महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, 1965 चे कलम 189 (4) अन्वये यादवारे**

कमांकः– 542/बांध/नर/नपव/१६
दिनांकः– 31/3/2017

प्रती,
आर. एस. व्ही रियालीटीज
पार्टनर रेजी वर्गीस आणि साजु वर्गीस
वर्धा.

No 21

21

विषय :– इमारत बांधकाम मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र ← Building Permission/Commencement Certificate.
संदर्भ :– आपला अर्ज कमांक १९२, दि. १२/०२/२०१६
महोदय,

विषयांकीत प्रकरणी संदर्भिय अर्जान्वये दाखल झालेल्या प्रस्तावा नुसार तपासणी अंती वर्धा येथील भुखंड क्र. ५ व ६ एकत्रीकरण शिट क्र. ६३ मौजा वर्धा भुखंडाचे क्षेत्र ६०७.५० चौ. मी. व त्या वरील बांधकाम क्षेत्र ७१४.१४ चौ.मी. तळ माळा व ४ माळा वाणिज्य व रहीवासीचे बांधकाम करण्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार मंजुरी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) समोरील तसेच मागिल व भुखंडाचे दोन्ही बाजुंनी प्रत्येकी अंमलबजावणीकरीता सोडावयास लागणा–या नियमाचे अंमलबजावणीकरीता म्हणुन रिकामी झालेली जागा सोडावयाची समास अंतरे ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

२) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरिता उपयोग अथवा राहण्याकरिता परवानगी घेतलेली/उपयोगी होण्याकरिता नसेल.

३) आरंभ प्रमाणपत्र/इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता अनुज्ञेय राहील.

४) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसीत करण्यासाठी परवानगी अधिकार राहणार नाही.

५) नकाशा मंजुर केल्याप्रमाणे/ लाल रंगाने त्यात दुरूस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास/भुखंडास लागुन असणा–र्या विद्यमान इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीस अनुसरून प्रस्तावीत घराचे/इमारतीचे बांधकाम असावयास पाहिजे.

६) न्हाणी व संडास, स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी, घाणपाणी व कचरा याची तांत्रीकदृष्टया योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

७) अर्जदारास मंजुर नकाशा व्यतीरिक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास नगरपालिकेची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक राहील.

८) बांधकाम परवानगी प्रमाणे प्लींथ लेव्हल पर्यंतचे बांधकाम कामे नगरपालिका कडुन तपासणी झाल्याशिवाय पुढिल बांधकाम करू नये.

९) बिना परवानगी बांधकाम साहित्य, मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकु नये, तसे आढल्यास आपणावर दंडात्मक वा साहित्य जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

१०) लेंआऊट टाकल्यानंतर खोदकामापुर्वी नगर पालिकेचे सक्षम अधिका–याकडुन तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्याशिवाय खोदकाम सुरू करू नये. वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणा–या परिणामाची सर्वसी जबाबदारी मिळकत धारकाची राहील.

११) भविष्यात नगर पालिकेला नालीकरीता जागा लागल्यास ती समास अंतरातुन विनामुल्य दयावी लागेल.

१२) मंजुर अभिन्यास/रेकॉर्ड प्रमाणे जागेची आखणी करून घेण्याची व मालकी हक्काची सर्वसी जबाबदारी अर्जदाराची राहील. नगर पालिकेची जबाबदारी राहणार नाही.

१३) बिना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वतः दोन महिन्याचे आत पाडुन टाकावे. अन्यथा नगरपालिका कोणतेही नोटीस न देता पाडुन टाकेल. होणा–या नुकसानीस अर्जदार स्वतः जबाबदार राहील व पाडण्याचा खर्च नगर परिषद वसुल करेल.